गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती २०१८/ प्र.क्र.११८/ शिक्षण

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३० मे, २०१९

संदर्भ : १) शासन निर्णय विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्र. शिवृत्ती २०१८/ प्र.क्र.११८/ शिक्षण, दिनांक ११ ऑक्टोबर,२०१८.

प्रस्तावना :-

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्याबाबत मा.मंत्रिमंडळाने दिनांक २१ ऑगस्ट,२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दि. ११/१०/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “ब” मधील अनु.क्र.१५ अन्वये छाननी समिती गठित करण्यात आली आहे. सदर छाननी समितीमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामधून पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी करण्यासाठी राज्य स्तरावर निवड समितीची स्थापना परिशिष्ट “ब” मधील अनु.क्र.१६ अन्वये करण्यात आली आहे. राज्य स्तरीय निवड समितीला सहाय्य करण्यासाठी प्रशासकीय विभाग स्तरावर उपसमिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्याबाबतच्या संदर्भाधिन शासन निर्णयातील अनु.क्र. १५ नंतर अनु.क्र. १५(अ) “प्रशासकीय स्तरावरील उपसमितीचा” समावेश करण्यात येत आहे. राज्यस्तरीय निवड समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यापुर्वी छाननी समितीने मंजूर केलेल्या प्रस्तावांची पडताळणी करण्यासाठी राज्यस्तरीय निवड समितीला सहाय्य करण्यासाठी सह सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय विभाग स्तरावर खालील प्रमाणे उप समिती गठित करण्यात येत आहे.

१. सह सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग	- अध्यक्ष
२. उप सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग	- सह अध्यक्ष
३. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग	- सदस्य
४. कक्ष अधिकारी (शिक्षण),विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग	- सदस्य सचिव
५. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण,मुंबई यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी	- सदस्य

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०५३११०५७५९३१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT,
o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.05.31 11:05:02 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर सचिव
३. मा.मंत्री,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,मंत्रालय, मुंबई
६. मा.प्रधान सचिव, महसुल व वन/वित्त / नियोजन /ग्रामविकास/ गृह निर्माण/ उद्योग,उर्जा व कामगार/ उच्च व तंत्रशिक्षण/ माहिती व तंत्रज्ञान/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये/ कृषी व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. मा.सचिव, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय,मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रशिध्दीसाठी)
९. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
१०. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण,मुंबई
११. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग
१२. सर्व सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण विभाग
१३. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१४. निवड नस्ती (शिक्षण).